महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पोलीस अधीक्षक,औरंगाबाद (ग्रामिण) यांचे कार्यालय,
टी.व्ही. सेन्टर रोड , सिडको एन १० औरंगाबाद-४३१००३
दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३८०९७८ फॅक्स क्र ०२४०-२३९२६३३
ईमेल- sp.aurangababad.r@mahapolice.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.आस्था/अर्जित रजा/२०२२/ 330 औरंगाबाद ग्रामीण, दि. 4 /०३/२०२२

## कार्यालयीन आदेश

विषय:- पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना ३० दिवस अर्जीत रजा + १५ धनार्जित रजा, मंजुरीबाबत.

पोलीस अधीक्षक,औरंगाबाद ग्रामीण कार्यरत पोलीस अधिकारी/अंमलदार यांना म.ना.से रजा नियम १९८१ मधील नियम ५०,५१, व ७३ अन्वये ३० दिवस अर्जीत रजा + १५ धनार्जित रजा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेचा अपव्यय टाळण्याच्या दृष्टीकोनातुन,विहित नमुन्यातील अर्ज सादर न करता, खालील तरतुदीच्या आधीन राहुन एकत्रीतपणे अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहेत.

१. संबंधीत पोलीस निरिक्षक, औरंगाबाद ग्रा यांनी एकुण कार्यरत मनुष्यबळ, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थती, तसेच संबंधित पोलीस अधिकारी/अंमलदार यांना रजेची निकड विचारात घेऊन, त्यांच्याकडुन अर्जित रजेचा अर्ज प्राप्त करुन त्यांना उपरोक्त मंजूर रजेवर सोडण्याबाबतची कार्यवाही करावी. संबंधित प्रभारी अधिकारी यांनी अशा अधिकारी / अंमलदार यांच्या रजेची शिफारस करतांना त्यांच्या शाखा/विभागामध्ये कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती १५ टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही याची दक्षता घ्यावी.
२. वारंवार कर्तव्यावर गैरहजर राहणारे पोलीस अधिकारी/ अंमलदार/ प्रसुती, प्रसुतीलगत व बालसंगोपन रजेवरुन हजर झालेल्या महिला पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या रजाखाती पुरेशी रजा शिल्लक आहे, याची कार्यालयाकडुन खात्री करुनच संबंधितांना रजेवर सोडण्यात यावे.
३. नमुद मंजूर रजेपेक्षा जास्त रजेची आवश्यकता असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी रजेच्या अर्जासह संबंधित लेखनीक हवलदार (मोहरील) यांच्यासमवेत पोलीस उपअधिक्षक, मुख्यालय, औरंगाबाद ग्रा यांच्या समक्ष उपस्थित राहुन, त्यांची मान्यता घेऊनच रजेवर जाण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.
४. धनार्जीत रजेचा लाभ हा एका वित्तीय वर्षात फक्त एकदाच देय असतो याबाबतची समज अर्जदार पोलीस अधिकारी /अंमलदार यांना द्यावी व ते एका वित्तीय वर्षात दुसऱ्यांदा धनर्जीत रजेची मागणी करणार नाही याची दक्षता घ्यावी.
५. धनार्जीत रजेचा लाभ नको असणाऱ्यांनी त्याबाबतचा अर्ज, अर्जित रजा उपभोगुन हजर होताना त्यांच्या संबंधीत लेखनीक हवलदार (मोहरील) यांच्याकडे द्यावा व संबंधीत लेखनीक हवलदार (मोहरील) यांनी अशा पोलीस अधिकारी/अंमलदारांची अर्जित रजेवरुन हजर झाल्याची कागदपत्रे व अर्ज सादर करतांना धनार्जीत रजा नको असल्याचा स्पष्ट उल्लेख त्यांच्या पृष्ठांकनात (Forwarding) करावा.
६. ज्या पोलीस अधिकारी /अंमलदार यांच्या रजाखाती कमी अर्जित रजा शिल्लक असतील त्यांना धनार्जीत रजेचा लाभ देण्यात येणार नाही व त्यांनी उपभोगलेली रजा ही असाधारण रजा नियमित करण्यात येईल.
७. स्वग्राम / महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीचा लाभ हवा असल्यास संबंधितानी त्याबाबतचा विविह नमुन्यातील परिपुर्ण अर्ज, प्रमाणपत्रे व रजा प्रवास सवलत उपभोगल्या बाबत प्रवास केल्याबाबतची रेल्वे / बसची तिकिट सादर करावीत
८. ज्या महीला पोलीस अधिकारी/ अंमलदार यांची पहिली/ दुसरी प्रसुती असेल अशांना म.ना.से रजा नियम ७४ अन्वये १८० दिवस प्रसुती व त्यालगतची रजा तसेच पहिले/ दुसरे अपत्य १८ वर्षापेक्षा लहान असणाऱ्या महिला पोलीस अधिकारी/अंमलदार शासन निर्णय क्र २०१७/प्र.क्र.२५/सेवा-६ दि २३/०७/२०१८ मधील तरतुदीस अनुसरुन ६० दिवस बालसंगोपन (विशेष) रजा मंजूर करण्यात येत

आहे. प्रसुतीलगतच्या व बालसंगोपन (विशेष) रजेवर सोडण्यापुर्वी संबंधित लेखनीक हवलदार (मोहरील) यांनी अशा महिला पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या रजाखाती पुरेशी रजा शिल्लक असल्याबाबत खात्री करावी व सदरच्या रजेवर असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या रजेच्या कालावधीबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीस या कार्यालयाच्या आस्थापना शाखेस (०२ प्रतीत) सादर करावा.

९. बालसंगोपन(विशेष) रजा मंजूर करताना ज्या महिला पोलीस अधिकारी/अंमलदार यांची शासन सेवा १० वर्षापेक्षा कमी असेल त्यांच्याकडुन सोबतच्या नमुन्यातील बंधपत्र परिपुर्ण भरुन घेऊन, संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी व शिक्का घेऊन मासिक अहवालासोबत या कार्यालयास सादर करावीत.

या कार्यालयाच्या आस्थापनेवर बदलुन येणाऱ्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना देखील याच आदेशान्वये रजेवर सोडण्याबाबत कार्यवाही करावी.

दि ०१/०१/२०२२ ते ३१/०३/२०२२ या दरम्यान ज्या पोलीस अंमलदार यांना अर्जीत रजा मंजूर झालेले आहे असे पोलीस अंमलदार यांना वगळुन , सदर रजा मंजुरी आदेश दि ०१/०१/२०२२ ते दि ३१/१२/२०२२ पर्येन्त वैध राहील व या कार्यालयातर्गत कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्यापुरताच तो मर्यादित असुन त्याचा वापर अन्य कार्यलयात होणार नाही.

सदरचा आदेश संबंधित पोलीस निरिक्षक यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात यावा.

Goyal

(निमित गोयल)

पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण

माहिती व पुढील कार्यवाही करीता.

प्रति :- अप्पर पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण.

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, औरंगाबाद ग्रामीण.

सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी, औरंगाबाद ग्रामीण.

सर्व शाखा अधिकारी, औरंगाबाद ग्रामीण.

राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, औरंगाबाद.

प्रत : आस्था-२,३,४ प्रमुख लिपिक लेखा शाखा, पोलीस लेखापाल, वेतन देयक लिपीक, जिल्हा पोलीस पत्रिका, पो.अ.का. औरंगाबाद ग्रामिण.